जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३५७ दिनांक -०४/०९/२०२४**

हडपसर पोलिस स्टेशन पुणे शहर

## अवैद्य दारू वाहतुक पकडून ७०० लिटर गावठी दारू टेम्पोसह जप्त. किं.रू २,४७,५०० /- चा मुद्देमाल हस्तगत हडपसर पोलीसांची कारवाई

आगामी काळात पुणे शहरात गणेशोत्सव साजरा होत असून त्या अनुषंगाने अवैध धंदे/वाहतुक यांचेवर परिणामकारक कारवाई करणेबाबत मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी आदेशीत केले होते.त्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पांढरे,यांनी तपास पथक अधिकारी व अंमलदार यांना अवैध धंदे व वाहतुक यावर कारवाई करणेबाबत सुचना दिल्या होत्या.

वरिष्ठांनी दिलेले आदेश/सुचनांप्रमाणे दिनांक ०४/०७/२०२२ हडपसर तपास पथकातीत अंमलदार श्रीकांत पांडुळे,भगवान हंबर्डे,चंद्रकांत रेजितवाड असे पहाटे च्या सुमारास पोलीस ठाणे हद्दीत रात्रगस्त करीत असताना,पोलीस अंमलदार श्रीकांत पांडुळे यांना गोपनीय बातमी मिळाली की,मारूती कॅरीअर या वाहनातुन अवैध दारूची वाहतुक होत आहे.

मिळालेल्या बातमीच्या आधारे रात्रगस्त अधिकारी सहा पोलीस निरीक्षक,उमेश रोकडे, पोलीस अंमलदार श्रीकांत पांडुळे,भगवान हंबर्डे,चंद्रकांत रेजितवाड यांनी १५ नंबर चौक येथे सापळा रचून सदरची गाडी आडवून त्यातील इसमांना त्यांची नाव पत्ते विचारले असता त्यांनी त्यांची नावे **१) राहुल दामोदर बनसोडे वय ४२ वर्ष रा. काळुराम मंदीराजवळ,सिद्राम मळा, लोणीकाळभोर २) सोमनाथ पोपट कांबळे व २२ वर्ष रा. सदर** असे असल्याचे सांगीतले. त्यांच्या मारूती कॅरीअर या गाडीची पाहणी केली असता त्यामध्ये १९ प्लॅस्टीकचे हत्ती कॅन्ड त्यामध्ये अंदाजे ७०० लिटर गावठी हातभट्टीची दारू मिळून आली.गुन्ह्याचे कामी टेंम्पो व गावठी दारू असा किं.रू २,४७,५०० /- चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.त्याबाबत **हडपसर पोलीस ठाणेस गु.र.नं १३९८/२०२४ प्रमाणे महाराष्ट्र प्रोव्हीबिशन अॅक्ट कलम ६५ (अ),६५(ड) अन्वये** गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी ही मा.अप्पर पोलीस आयुक्त,पुर्व प्रादेशिक विभाग,श्री.मनोज पाटील, मा. पोलीस उप आयुक्त,परिमंडळ ५ श्री.आर.राजा, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, हडपसर विभाग पुणे,श्रीमती अश्विनी राख, यांचे मागदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर,श्री.संतोष पांढरे, पोनि.(गुन्हे),निलेश जगदाळे,यांचे सुचनांप्रमाणे सहाय्यक पोलीस निरीक्षक उमेश रोकडे, पोलीस अंमलदार दिपक कांबळे,समीर पांडुळे,भगवान हंबर्डे,चंद्रकांत रेजितवाड यांचे पथकाने केली आहे.

